मा.क्र. 5

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/झोनिआ/२४०८/२०२५
दिनांक : १८/११ /२०२५.

# झोपडपट्टी निर्मूलन आदेश

## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सह कलम १२ अन्वये)

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ ब व ६३३, सावधान मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था, महात्मा फुले पेठ, गंजपेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ८१३२.४३ **चौ.मी.** (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी मनपाने राबवलेल्या प्रकल्पा व्यतिरिक्त उर्वरित जागेवर अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दि.२०/०२/२०२० व दि.२५/०४/२०२५ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र.१४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दि.१०/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करुन दि.२७/११/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ६९० झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ५७१, बिगरनिवासी पात्र २०, संयुक्त पात्र ०४ या प्रमाणे एकुण ५९५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(४) सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ब या मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दि.२०/०२/२०२० रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार फेब्रुवारी २७ ते मार्च ४, २०२० रोजीच्या राजपत्रात पान क्र.७ वर व तसेच स्थानिक वृत्तपत्र "सांज महानगरी" व "महाराष्ट्र निरोप्या"या वृत्तपत्रात मध्ये दि.२८/०२/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच, सि.स.नं.६३३ या मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(क) अन्वये झोपडपट्टी

पुनर्वसन अंतिम आदेश दि.२५/०४/२०२५ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश स्थानिक वृत्तपत्र "दैनिक लोकमत" दि.०१/०५/२०२५ रोजी व "विश्वेश्वर" मध्ये दि.३०/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे व महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार मे ८-१४, २०२५ रोजीच्या राजपत्रात पान क्र.१३ वर प्रसिध्द करणेत आला आहे.

(५) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणा-या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड सह कलम १२ अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

(६) विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ ब व ६३३, सावधान मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था, महात्मा फुले पेठ, गंजपेठ, पुणे या ठिकाणच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सर्व पात्र झोपडीधारकांना भाडे देवून त्यांची तात्पुर्ती राहण्याची सोय केलेली आहे. तरी संक्रमणाची सर्व जबाबदारी ही केवळ आमची राहिल तसेच याबाबत भविष्यात काही वाद-विवाद निर्माण झाल्यास त्याचे निराकरण आम्ही करु व त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसनास कोणतीही तोशीष लागू देणार नाही असे रु.५००/- च्या मुद्रांकावरील दि.१६/१०/२०२५ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नगररचना विभागाने संक्रमण व्यवस्थेसाठी प्रति पात्र झोपडीधारक प्रति महा किमान रू.५१३१/- इतके भाडे निर्धारित केले आहे.

(७) झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतूदींची पूर्तता करण्याच्या आधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ ड सह कलम १२ (१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u> :-

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ ब व ६३३, सावधान मागासवर्गीय सहकारी गृहरचना संस्था, महात्मा फुले पेठ, गंजपेठ, पुणे**

**महानगर पालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका**

| पेठ | सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| महात्मा फुले पेठ, गंज पेठ | सि.स.नं.५९३क | पुणे मनपा | ८१३२.४३ चौ.मी. | **पुर्वेस -** लागु फा.प्लॉट क्र. २२९ |
| | सि.स.नं.६३१, ६३२अ, ६३२ब | विकसक नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. | | **दक्षिणेस -** लागु फा.प्लॉट क्र.२१७ |
| | सि.स.नं.६३३ | सरकारी (महाराष्ट्र शासन) | | **पश्चिमेस -** लागू न.भु.क्र.६२९, ६३० व लागु रस्ता<br>**उत्तरेस -** लागु रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १८ / ११ /२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

१३/११/२०२५

(सतीशकुमार खडके भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६ वरील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या ५ प्रती या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांना माहितीस्तव
५. मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. २२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४